सेन्सेक्स : ७७,०४२.८२
▲ ३१८.७४ (+०.४२%)

निफ्टी : २३,३११.८०
▲ ९८.६० (+०.४२%)

तेल $: ८१.८८ (▼ ०.१८%)

डॉलर ₹ : ८६.५६ (▲ १६ पैसे)

राज्यात ब्राइटनाईटच्या ११५ मेगावॉट ऊर्जा प्रकल्प

मुंबई: राज्यातील पहिल्या एकत्रित पवन-सौर संकरित ११५ मेगावॉट क्षमतेच्या वीज प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात ब्राइटनाइट पॉवर इंडियाने केली. दक्षिण महाराष्ट्रातील धाराशीव येथे सुमारे ५०० एकर क्षेत्रफळात पसरलेल्या 'ऑप्टिमा महाराष्ट्र' प्रकल्पातून ब्राइटनाईटच्या एआय-सक्षम पॉवरअल्फा मंचाद्वारे संचालित प्रगत तंत्रज्ञान वापरले गेले आहे. कमीतकमी पर्यावरणीय प्रभावासह जास्त वीजनिर्मिती शक्य होणार आहे.

मिरॅ ॲसेट स्मॉल कॅप फंड गुंतवणुकीस खुला

मुंबई: प्रामुख्याने उच्च कामगिरी असलेल्या स्मॉल कॅप कंपन्यांच्या संभाव्य वाढीत सहभागी होण्याची संधी देणारी नवीन योजना मिरॅ ॲसेट म्युच्युअल फंडाने खुली केली आहे. नवीन 'मिरॅ ॲसेट स्मॉल कॅप फंडा'त येत्या २४ जानेवारीपर्यंत प्रारंभिक गुंतवणूक खुली असून, ३ फेब्रुवारीपासून ही योजना निरंतर विक्री व पुनर्खरीदीसाठी खुली होईल. हा फंड निफ्टी स्मॉल कॅप २५० टीआरआय या मानदंड निर्देशांकावर बेतलेला असून, त्याचे निधी व्यवस्थापन वरूण गोयल हे करतील. या योजनेत केवळ ९९ रुपयांपासून 'एसआयपी' गुंतवणूक सुरू करता येईल, अथवा ५,००० रुपयांची किमान एकरकमी गुंतवणूक केली जाऊ शकेल.

कर वजावटीत गल्लत

९० हजार पगारदारांकडून १,०७० कोटींची सदोष करबचत

पीटीआय, नवी दिल्ली

देशभरात सार्वजनिक उपक्रम तसेच खासगी क्षेत्रातील सुमारे ९०,००० पगारदारांनी तब्बल १,०७० कोटी रुपयांचे दाखल केलेले चुकीचे कर वजावटीचे दावे ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत मागे घेतले, असे सरकारी सूत्रांकडून गुरुवारी सांगण्यात आले.

प्राप्तिकर विभागाने केलेले सर्वेक्षण, पडताळणी तसेच विविध झडती आणि जप्तीच्या कारवायांतून या गोष्टीचा उलगडा झाला आहे. कर वजावटीच्या तरतुदींचा लाभ घेऊन एकूण करपात्र उत्पन्न कमी करणे शक्य असलेल्या जुन्या पद्धतीने प्राप्तिकर विवरणपत्र दाखल केलेल्या पगारदारांकडून ही गल्लत झाली आहे. या पगारदारांनी त्यांच्या प्राप्तिकर विवरणपत्रात, कलम ८०सी, ८०डी, ८०ई, ८०जी, ८०जीजीबी, ८०जीजीसी अंतर्गत चुकीच्या वजावटींचा दावा केला. ज्यामुळे सरकारला देय कराचे प्रमाण कमी झाले, असे प्राप्तिकर विभागाच्या लक्षात आले. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत, सुधारीत विवरणपत्र दाखल करून सुमारे ९०,००० करदात्यांनी त्यांच्या मूळ विवरणपत्रातील सुमारे १,०७० कोटी रुपयांच्या चुकीच्या वजावटींचा दावा मागे घेतला आणि अतिरिक्त कर भरला, असे सूत्रांनी स्पष्ट केले.

कोणत्या विसंगतींचा उलगडा?

करदात्यांनी त्यांच्या विवरण पत्रामध्ये कलम ८०जीजीबी / ८० जीसीसी अंतर्गत दावा केलेल्या एकूण वजावटीत आणि त्यांच्याकडून दाखल विवरणपत्राशी जोडलेल्या एकूण प्राप्तीत देखील मोठी तफावत आहे, असे प्राप्तिकर विभागाकडे असलेल्या माहितीच्या विश्लेषणातून दिसून आले. तसेच, कलम ८०सी, ८०ई, ८०जी,अंतर्गत दावा केलेल्या वजावटीही संशयास्पद स्वरूपाच्या दिसून आल्या. काही भामट्या मध्यस्थांकडून चुकीच्या वजावटी/परताव्याच्या दाव्यासाठी करदात्यांची दिशाभूल केली गेली, असे पडताळणीतून दिसून आल्याचे सूत्रांनी सांगितले.

अशा चुकार पगारदार व्यक्ती सार्वजनिक उपक्रम, बड्या कंपन्या, बहुराष्ट्रीय कंपन्या, मर्यादित दायीत्व कंपन्या तसेच खासगी मर्यादित कंपन्या अशी विविध क्षेत्रात कार्यरत आहेत, असे तपासादरम्यान उघड झाल्याचे सूत्रांनी सांगितले. तसेच, चुकीच्या कर वजावटीचा दावा करणाऱ्यांपैकी बहुतांश एकाच कंपनीत काम करत असल्याचेही दिसून आले. अर्थात नियोक्त्यांकडूनच उद्गम कर (टीडीएस) कपात करतानाच कूचराई झाली आहे.

चुकांची दुरूस्ती कशी?

प्राप्तिकर कायदा, १९६१ च्या तरतुदींनुसार, करदाते संबंधित कर निर्धारण वर्षाच्या समाप्तीनंतर, दोन वर्षांच्या आत, म्हणजेच मूल्यांकन वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ साठी सुधारीत विवरणपत्र दाखल करू शकतात आणि देय असल्यास अतिरिक्त कर भरू शकतात.

अदानी समूहाच्या समभागांना उत्साही भरते

'हिंडेनबर्ग रिसर्च' बंद करण्याच्या घोषणेचा परिणाम

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: अब्जाधीश गौतम अदानी यांच्यासह जगभरातील दिग्गजांवर गैरव्यवहाराच्या आरोपांचे संशोधन अहवाल प्रसिद्ध करून खळबळ उडवून देणाऱ्या 'हिंडेनबर्ग रिसर्च'ला टाळे लावण्याच्या तिचे संस्थापक नॅथन अँडरसन यांच्या आकस्मिक घोषणेचे भांडवली बाजारात मुख्यतः अदानी समूहातील कंपन्यांच्या समभागांत स्वागतपर मूल्य-उसळीचे पडसाद उमटले. बाजार खुला होताच अदानींच्या सर्वच समभागांचे भाव अडीच ते नऊ टक्क्यांपर्यंत वधारले.

गुरुवारच्या व्यवहारांअंती, अदानी समूहातील ध्वजाधारी कंपनी अदानी एंटरप्राइजेस (१.६६ टक्के), अदानी पोर्ट्स (१.९४ टक्के), अदानी पॉवर (२.३४ टक्के), अदानी एनर्जी सोल्युशन्स (१.५८ टक्के), अदानी ग्रीन एनर्जी (३.४० टक्के) आणि अदानी टोटल गॅस (१.६८ टक्के) यांनी चांगली भरारी घेतली. समूहातील अन्य समभागही सकारात्मक पातळीवर व्यवहार करत होते.

सकाळच्या सत्रातील लक्षणीय वाढ पाहता, बाजारातील व्यवहार संपेपर्यंत नफावसुलीने त्यात काहीशी घट झाली. एनडीटीव्हीचा समभाग १५.५९ टक्क्यांवरून, ९.१५ टक्के, अम्बुजा सीमेंट ४.५५ टक्क्यांवरून, ३.८८ टक्के, तर एसीसीमधील वाढ ४.१४ टक्क्यांवरून, ०.९३ टक्क्यांपर्यंत दिवसअखेर खुंटली. सांघी इंडस्ट्रीजमध्ये ३.३४ टक्के वाढ झाली, तर अदानी विल्मर १.१९ टक्के घसरणीसह बंद झाला.

अँडरसन यांनी हिंडेनबर्ग बंद करण्याच्या त्यांच्या निर्णयामागील कारणांचा उल्लेख केला नसला तरी अमेरिकेतील सत्तापालट आणि ट्रम्प प्रशासनाची राजवट सुरू होण्यापूर्वी त्यांनी टाकलेले हे पाऊल पुरेसे सूचक आहे. या निर्णयाची घोषणा करताना, अँडरसन यांनी स्पष्ट केले की, या निर्णयामागे कोणतेही बाह्य धोके, वैयक्तिक आरोग्यमान किंवा मोठ्या समस्या असे काहीही कारण नाही. जीवनाच्या इतर पैलूंवर लक्ष केंद्रित करण्याच्या इच्छेने प्रेरित हा निर्णय असून, कुटुंब, मित्र आणि कंपनीतील सहकाऱ्यांमध्ये त्याची वाच्यता वर्षाच्या अखेरीस त्यांनी केली आहे, असेही ते म्हणाले.

अदानी समूहाविरुद्ध २०२२ मध्ये आर्थिक गैरव्यवस्थापनाच्या हिंडेनबर्गच्या आरोपांमुळे भांडवली बाजारात अदानी समूहातील कंपन्यांच्या समभागांचे मोठे नुकसान झाले होते. पडझडीचे स्वरूप इतके तीव्र होते की, अवघ्या काही दिवसांत या कंपन्यांच्या बाजार भांडवलाला १५० अब्ज अमेरिकी डॉलरचे नुकसान सोसावे लागले होते.

कॉसमॉस बँकेच्या व्यवस्थापन मंडळाच्या अध्यक्षपदी काळे

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

पुणे : कॉसमॉस बँकेच्या व्यवस्थापन मंडळाच्या अध्यक्षपदी बँकेचे माजी अध्यक्ष सीए मिलिंद काळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बँकेचा वाढत जाणारा विस्तार आणि व्यवसाय यांचा विचार करून संचालक मंडळाने व्यवस्थापन मंडळाची पुनर्रचना केल्याचे गुरुवारी स्पष्ट केले.

बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. प्रल्हाद कोकरे, उपाध्यक्ष सीए यशवंत कासार आणि व्यवस्थापकीय संचालिका अपेक्षिता ठिपसे यांनी पत्रकार परिषदेत नवीन व्यवस्थापकीय मंडळासंबंधी माहिती दिली. मंडळाच्या सदस्यांमध्ये सीए जयंत बर्वे, ॲड. अनुराधा गडाळे, ॲड. मुकेशकुमार शहा, गजानन गोडबोले, संजीव खडके, सुनिता भोर, सुशीलकुमार सोमाणी, नितीन पटवर्धन, डॉ. अच्युथा जॉयस, ॲड. अजय सूर्यवंशी आणि विजय कुलकर्णी यांचा समावेश आहे.

ॲड. कोकरे म्हणाले, व्यवस्थापन मंडळामध्ये बँकेच्या आधीच्या संचालक मंडळातील तीन संचालकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा फायदा बँकेस होईल. व्यवस्थापन मंडळातील सर्व सदस्य हे विविध क्षेत्रातील तज्ज्ञ असून त्यांची मदत बँकेची ध्येयधोरणे ठरवताना व त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करताना होणार आहे.

कॉसमॉस बँकेने आतापर्यंत अडचणीत आलेल्या एकूण १९ सहकारी बँकांचे विलीनीकरण करून घेतले आहे. नुकतेच बंगळुरूतील दि नॅशनल बँकेचे विलीनीकरण करून घेण्यात आले.

रिलायन्सचा निव्वळ नफा वाढून १८,५४० कोटींवर

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: बाजार भांडवलाच्या दृष्टीने देशातील सर्वात मोठी खासगी कंपनी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने गुरुवारी १८,५४० कोटी रुपयांच्या निव्वळ नफ्याच्या तिमाही कामगिरीची घोषणा केली. वार्षिक तुलनेत नफ्यातील ७.४ टक्के वाढ एकंदर विश्लेषकांच्या अपेक्षेपेक्षा सरस ठरली.

सरलेल्या डिसेंबरअखेर तिमाहीत कंपनीचा एकंदर महसूलही वार्षिक तुलनेत ७ टक्क्यांनी वाढून २,४३,८६५ कोटी रुपयांवर गेला आहे. रिलायन्सच्या पारंपरिक तेल ते रसायन (ओ२सी) व्यवसायातून महसूल ६ टक्क्यांनी वाढून १,४९,५९५ कोटी रुपये राहिला. तर वायू व संशोधन विभागाचा महसूल ५.२ टक्क्यांनी घसरला. त्या उलट जिओ प्लॅटफॉर्म्स विभागाचा एकंदर महसूल तब्बल १९.२ टक्क्यांनी वाढून ३८,७५० कोटी रुपयांवर गेला. रिलायन्स रिटेल व्हेंचर्स या किराणा व्यवसाय विभागातून ८.८ टक्के वाढीसह ९०,३३३ कोटी रुपयांचा महसूल कंपनीने कमावला.

जागतिक ऊर्जा बाजारपेठेत दीर्घकाळ सुरू राहिलेल्या अस्थिरतेनंतरही, कंपनीच्या ओ२सी व्यवसायाने अंगभूत कणखरता दर्शविणारी कामगिरी केली, असे या तिमाही निकालासंबंधाने रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मुकेश अंबानी म्हणाले.

'सेन्सेक्स' ७७ हजारांपार!

मुंबई: अनुकूल बातम्यांच्या ओघाने भांडवली बाजारात गुरुवारी सलग तिसऱ्या दिवशी सेन्सेक्स-निफ्टीने आगेकूच कायम ठेवली. कंपन्यांच्या तिमाही निकालातील चांगली कामगिरी, इस्त्रायल-हमास युद्धविराम, हिंडेनबर्ग रिसर्चला टाळे लावण्याची संस्थापक अँडरसन यांची घोषणा आदींच्या परिणामी सेन्सेक्स दिवसअखेर ३१८.७४ अंशांच्या वाढीसह, ७७,०४२.८२ अंशांवर स्थिरावला. निफ्टीदेखील ९८.६० अंश वाढून २३,३११.८० या पातळीवर बंद झाला.

'महाबँके'च्या तिमाही नफ्यात ३६ टक्के वाढ

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

पुणे: बँक ऑफ महाराष्ट्रला (महाबँक) डिसेंबरअखेर संपलेल्या तिमाहीत १,४०६ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. बँकेच्या नफ्यात ३६ टक्के वाढ नोंदविण्यात आली असून, बँकेच्या व्याज उत्पन्नातही वाढ झाली आहे.

पुण्यात मुख्यालय असलेल्या महाबँकेचे तिमाही आर्थिक निकाल बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्याधिकारी निधू सक्सेना, कार्यकारी संचालक आशिष पांडे आणि रोहित ऋषी यांनी गुरूवारी पत्रकार परिषदेत जाहीर केले. महाबँकेला गेल्या वर्षी याच तिमाहीत १,०३६ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला होता. यंदाच्या तिमाहीत बँकेच्या निव्वळ नफ्यात ३५.८२ टक्के वाढ होऊन तो १,४०६ कोटी रुपयांवर गेला आहे.

बँकेला तिसऱ्या तिमाहीत ७,११२ कोटी रुपयांचे एकूण उत्पन्न मिळाले आहे. गेल्या आर्थिक वर्षात याच तिमाहीत ते ५,८५१ कोटी रुपये होते. बँकेने तिसऱ्या तिमाहीत ६,३२५ कोटी रुपयांचे व्याजापोटी उत्पन्न मिळविले आहे.

GOVERNMENT OF MAHARASHTRA, HOME DEPARTMENT (PORTS & TRANSPORT)
MAHARASHTRA MARITIME BOARD
Indian Mercantile Chambers, 2nd Floor, Ramjibhai Kamani Marg, Ballard Estate, Mumbai-400 001. Tel.: 022-69041777, Fax : 022-69041740
Website : https://mahammb.maharashtra.gov.in
Email : ceo.mmb@maharashtra.gov.in / ceommb@gmail.com

E-Tender Notice - (Year 2024-25)

Main Portal: https://mahatenders.gov.in

Maharashtra Maritime Board (MMB), Mumbai intends to invite bids from the eligible agencies for the following works:

Sr. No.	Name of Works	Date and Time of Pre-Bid Meeting
1	Appointment of Consulting Agency for the Preparation of Land Management and Waterfront Allotment Policy for Maharashtra Maritime Board	20.01.2025 @1500 Hrs
2	Appointment of Consultant for Preparing Shipyard Policy to promote Shipbuilding and Ship Repair in Maharashtra	20.01.2025 @1600 Hrs
3	Appointment of Consultant for Preparation of Feasibility Report of Passenger Water Transportation using Green Vessel on the Eastern Coast of Mumbai	20.01.2025 @1700 Hrs

The details can be viewed online and downloaded directly from the Government of Maharashtra E-Tendering Portal **https://mahatenders.gov.in** from **16.01.2025 at 1800 hours (IST) till 24.01.2025 at 1700 hours.**

MMB reserves the right to accept or reject any or all of the bids without assigning any reason whatsoever.

Sd/-
Chief Executive Officer,
Maharashtra Maritime Board, Mumbai

Date : 16.01.2025
Place : Mumbai

Reliance Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२–३५५५ ५००० • फॅक्स: ०२२–२२०४ २२६८ • ई–मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

३१ डिसेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि नऊ महिन्याचा अलेखापरीक्षित एकत्रित वित्तीय परिणामांचा संक्षिप्त गोषवारा

(₹ कोटीत, प्रति समभाग आकडेवारी व्यतिरिक्त)

तपशिल	संपलेले तिमाही	संपलेले नऊ महिने	संपलेले तिमाही
	३१ डिसेंबर, २०२४	३१ डिसेंबर, २०२४	३१ डिसेंबर, २०२३
विक्री व सेवा मूल्य (महसूल)	२६७,१८६	७८३,०३६	२४८,१६०
वजा: वसूल केलेला जीएसटी	२३,३२१	६७,४७३	२०,१९०
प्रचलनाद्वारे महसूल	**२४३,८६५**	**७१५,५६३**	**२२७,९७०**
करपूर्व नफा	२८,६४३	७६,९१४	२५,८३३
करपश्चात नफा	**२१,८०४**	**५८,३५३**	**१९,४८८**
सहयोगी आणि संयुक्त उपक्रमाचा नफा/(तोटा) यातील हिस्सा	१२६	३४५	१५३
करपश्चात नफा आणि सहयोगी आणि संयुक्त उपक्रमाचा नफा/(तोटा) यातील हिस्सा	**२१,९३०**	**५८,६९८**	**१९,६४१**
एकूण सर्वसमावेशक मिळकत (कर वगळता)*	२०,०१०	५५,५६९	२०,०९१
भरणा केलेले इक्विटी समभाग भांडवल, इक्विटी समभाग प्रत्येकी दर्शनी मूल्य ₹१०/– मूल्याचा	१३,५३२	१३,५३२	६,७६६
पुनर्मूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी**	–	–	–
प्रति इक्विटी समभाग मिळकत (₹ मध्ये) (दर्शनी मूल्य ₹१०/– प्रत्येकी)			
मूळ (₹ मध्ये)	१३.७०	३७.१३	१२.७६
सौम्य (₹ मध्ये)	१३.७०	३७.१३	१२.७६

*नियंत्रण विरहित स्वारस्य शेअर समाविष्ट
**३१ मार्च, २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा पुर्नमूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी ₹ ७,८६,७१५ कोटी.

टिपा:

१. तिमाहीच्या दरम्यान, ए)१४२,५६५ अंशात्मक भरणा करण्यात आलेले इक्विटी समभाग जप्त करण्यात आल्यानंतर रद्द करण्यात आले आणि बी) रेकॉर्ड तारखेला (म्हणजे २८ ऑक्टोबर, २०२४ रोजी) सिक्युरिटी प्रीमियमचे भांडवलीकरण करून ६७६,६१,८६,४४९ इक्विटी समभागांचे पात्र इक्विटी समभागधारकांना बोनस इक्विटी सहभाग म्हणून वाटप करण्यात आले. 'आयएनडी एएस ३३ – प्रति इक्विटी समभाग मिळकत' नुसार बोनस सहभागांच्या वाटपाला परिणाम देण्यासाठी ३१ डिसेंबर, २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीतील प्रति सहभाग मिळकतीची आकडेवारी पुन्हा नमूद करण्यात आली.

२. १६ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकांमध्ये लेखापरीक्षण समितीने वरील परिणामांचा आढावा घेतला आहे आणि संचालक मंडळाने वरील परिणाम मंजूर केले असून ते प्रसारित करण्यास मंजुरी दिली आहे. कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील परिणामांचा मर्यादित आढावा घेतला आहे.

३. अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय परिणामांविषयी अधिक माहिती खालील प्रमाणे आहे:

(₹ कोटीत)

तपशिल	संपलेले तिमाही	संपलेले नऊ महिने	संपलेले तिमाही
	३१ डिसेंबर, २०२४	३१ डिसेंबर, २०२४	३१ डिसेंबर, २०२३
विक्री व सेवा मूल्य (महसूल)	१३४,१३३	४१४,४८३	१३६,०८३
वजा: वसूल केलेला जीएसटी	५,८७३	१७,८३८	५,५०४
प्रचलनाद्वारे महसूल	**१२८,२६०**	**३९६,६४५**	**१३०,५७९**
करपूर्व नफा	११,५९७	३१,९५७	१२,९७८
करपश्चात नफा	**८,७२१**	**२४,०४५**	**९,९२४**
एकूण सर्वसमावेशक मिळकत (कर वगळता)	६,४२२	२२,३८९	१०,०८३

४. ३१ डिसेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि नऊ महिन्याचा तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्टस्) रेग्युलेशन्स्, २०१५ मधील रेग्युलेशन ३३ अनुशंगाने स्टॉक एक्सचेंजकडे सादर करण्यात आला आहे व वरील परिणाम त्यांचा संक्षिप्त गोषवारा आहेत.

३१ डिसेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि नऊ महिन्याचा तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटवर **(www.bseindia.com / www.nseindia.com)** आणि कंपनीच्या वेबसाईटवर **https://www.ril.com/investor/ resource-center/corporate-announcements** येथे उपलब्ध आहेत आणि खालील क्विक रिस्पॉन्स कोड स्कॅन करून देखील ते उपलब्ध करून घेता येतील.

दिनांक : १६ जानेवारी, २०२५

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/–
मुकेश डी. अंबानी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

www.ril.com

सिडको शहरांचे शिल्पकार

बोली मागविणारी सूचना

उल्वे नोड, नवी मुंबई येथील सेक्टर - २०, २१ व २३ च्या भागांमधील उर्वरित एकात्मीकृत कामांचा विकास.

सिडको ऑफ महाराष्ट्र लिमिटेड हे याखाली नमूद केलेल्या कामाकरिता, ज्यांनी रस्ते, एस. डब्लू. ड्रेन काम, मलनिस्सारण नेटवर्क यासारखी कामे एकत्रितरीत्या किंवा स्वतंत्ररीत्या पूर्ण केलेली आहेत व जे सिडको लि. किंवा केंद्र सरकार किंवा महाराष्ट्र राज्य सरकार किंवा त्यांच्या योग्य वर्गात व प्रवर्गातील उपक्रमांत नोंदणीकृत आहेत व अनिवार्य पात्रता कसोट्यांची पूर्तता करीत आहेत, अशा अनुभवी भावी बोलीदारांकडून ई-प्रक्रियेद्वारा **"ऑनलाइन" आयटम दर टक्केवारी बोली** मागवीत आहेत.

१. कामाचे नाव : उल्वे नोड, नवी मुंबई येथील सेक्टर - २०, २१ व २३ च्या भागांमधील उर्वरित एकात्मीकृत कामांचा विकास. २. सी.ए.नं. : ०७ / सिडको / ईई (उल्वे-I) / २०२४-२५. **३. बोलीकरिता ठेवलेली किंमत** : रु. ४,६९,२१,०२७.२२/- (जीएसटी वगळता) (रु. ४,६२,२०,७८५.७२ बोलीयोग्य भाग + रु. ७,००,२४१.५० बिगर-बोलीयोग्य भाग) **४. इ.र.ठे.** : रु. ४,७०,०००/-. **५. नोंदणी वर्ग** : वर्ग- II (सिव्हिल) **६. पूर्तता कालावधी** : ५४८ (पाचशे अठ्ठेचाळीस) दिवस (पावसाळा समाविष्ट). **७. निविदा प्रक्रिया शुल्क** : रु. ११,८००.०० (जीएसटी १८% समाविष्ट (ना परतावा))

तत्सम कामाचे विवरण :

बोलीदाराजवळ मागील ७ (सात) वर्षांच्या कालावधीदरम्यान एकत्रितरीत्या किंवा स्वतंत्ररीत्या रस्ते, एस. डब्लू. ड्रेन काम, मलनिस्सारण नेटवर्क यासारखी कामे पूर्ण केलेली असल्याचा अनुभव असावा.

बोली कार्यक्रमासह बोली कागदपत्रे २०.०१.२०२५ रोजी सायं. ०५.०१ वा. पासून **https:mahatenders.gov.in** या वेबसाइटवर उपलब्ध असणार आहेत.

अधीक्षक अभियंता
(डी अँड यू)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४०३/२०२४-२५

IHCL
THE INDIAN HOTELS COMPANY LIMITED

ई-निविदा सूचना

मुंबई प्रदेशासाठी खाली नमूद केलेल्या श्रेणींसाठी दि. १ एप्रिल २०२५ ते दि. ३१ मार्च २०२६ रोजीपर्यंत द ताज महाल पॅलेस, ताज लँड्स एंड, ताज सांताक्रूझ, ताज वेलिंग्टन मेव्स, प्रेसिडेंट- आयएचसीएल सिलेक्शन्स, विवांता नवी मुंबई, तुर्भे, ताज द ट्रीज, जिंजर मुंबई आणि ताज सॅट्स एअर केटरिंग लिमिटेड यांच्यासाठी दर कराराच्या आधारावर खालील वस्तूंच्या पुरवठ्यासाठी, स्थापित कंत्राटदार/विक्रेत्यांकडून कोटेशन आमंत्रित करीत आहे :

- स्थानिक भाज्या, कांदा आणि बटाटे, भारतीय फळे, आयात केलेली फळे, विदेशी भाज्या आणि ताजे मशरूम, आयात केलेल्या इंग्रजी भाज्या, हायड्रोपॉनिक भाज्या, गोठलेले हिरवे वाटाणे आणि मका, इडली आणि डोसा बॅटर, गोठलेले टॉर्टिला रॅप्स, गोठलेले कापलेले भाज्या/किसलेले नारळ, ताजी चपाती, कुल्फी, मसाले, ड्रायफ्रुट्स, आटा मैदा, सोललेला लसूण आणि कांदा, ताजे आणि कोल्ड प्रेस ज्यूस, साखर, सुका बर्फ, कोळसा, सर्व कापलेल्या भाज्या आणि फळे, नूडल्स, टोफू, बँटन रोल, बीन्स स्प्राऊट्स, स्वीट, स्नॅक्स आणि फरसाण, ब्रेड आणि पाव.
- सुका कचरा आणि वापरलेल्या स्वयंपाकाच्या तेलाची हॉटेल्समधून वार्षिक दर कराराच्या आधारावर विक्री होईल. कंत्राटदाराकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून भंगाराची विल्हेवाट/पुनर्प्रक्रिया करण्यासाठी सर्व अनिवार्य परवाने असले पाहिजेत आणि त्यांना आरयूसीओ आणि एफएसएसएआय यांच्याद्वारे मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे. सुका कचरा विक्रीसाठी पर्यावरण आणि पर्यावरण मंत्रालय/सीपीसीबी रिसायकलर्स/पुनर्प्रेशर म्हणून नोंदणीकृत विक्रेत्यांना आणि पर्यावरणीयदृष्ट्या योग्य व्यवस्थापन सुविधा असलेल्या विक्रेत्यांनाच प्राधान्य दिले जाईल.

नोंदणी अर्ज/निविदा अर्ज मिळविण्यासाठी विक्रेत्यांना खालील वेब लिंकवर प्रवेश करून नोंदणी करता येईल. ई-निविदा अर्ज **दि. १८ जानेवारी २०२५ ते दि. ४ फेब्रुवारी २०२५ रोजीपर्यंत** खाली नमूद केलेल्या क्रेडेन्शियल्सवर उपलब्ध असतील. अर्ज करू इच्छिणाऱ्यांना निविदा अर्ज वाटपासाठी प्रत्येक श्रेणीतील निविदा अर्ज मिळविण्यासाठी ऑनलाइन **रु. २०००/- (परत न होणारे)** भरावे लागतील. ऑनलाइन विक्रेता नोंदणी अर्ज कोटेशनसह योग्यरित्या भरलेले **दि. ५ फेब्रुवारी २०२५** रोजी किंवा त्याआधी ऑनलाइन सादर करावे लागतील. अर्ज करण्याचा प्रस्ताव देणाऱ्या सर्व निविदाकारांकडे व्यवसाय करण्यासाठी आवश्यक असलेले सर्व अनिवार्य परवाने असले पाहिजेत आणि त्यांनी आजच्या तारखेनुसार आणि वेळोवेळी लागू होणारे एफएसएसएआय कायदा/नियम आणि नियमांचे पालन केले पाहिजे.

एफएसएसएआय मानकांनुसार सर्व उत्पादने आणि थंडगार आणि गोठविलेल्या वस्तूंसाठी तापमान लेबलिंग करणे अनिवार्य आहे. एचएसीसीपी/ आयएसओ प्रमाणित विक्रेत्यांना प्राधान्य दिले जाईल.

प्रारंभिक दर सादर करण्याची खिडकी शेवटची तारीख **दि. ५ फेब्रुवारी २०२५** रोजीपर्यंत खुली असेल.

आम्ही इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापन, मुंबई निविदा स्वीकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार राखून आहोत. प्रस्ताव ऑनलाइन सादर करायचे आहेत, कोणतेही प्रिंटआऊट्स/फिजिकल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

संपर्क: मटेरियल मॅनेजर, प्रेसिडेंट, मुंबई-आयएचसीआय सिलेक्शन्स,
दूरध्वनी क्र. ०२२-६६६५ ०८०८ / ६६६५ ०९६६.
निविदा कागदपत्रे डाउनलोड करण्यासाठी आणि ई-निविदामध्ये सहभागी होण्यासाठी लिंक
https://etendering.tajhotels.com/mumbai

TAJ SELECTIONS GATEWAY VIVANTA GINGER TREE OF LIFE amā Qmin TAJ SATS